www.saiphy.com




www.saiphy.com

## निबंधलेखन - वैचारिक / काल्पनिक

**सुरुवात**

‘मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू जात
आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभाळात’

खरेच, इंद्रधनुष्यात फक्त सात रंग असतात; पण मनात मात्र कल्पनांचे हजार रंग असतात. त्यातलाच हा एक रंग ... विषय लिहावा

(यानंतर तीन परिच्छेद लिहावेत.)

www.saiphy.com

## शेवट

'मनी वसे ते स्वप्नी दिसे' कल्पनांच्या आभाळाला अंत नसतो.
आपण कितीही विचार केला तरी तो कमीच आहे. कारण, विचारांना सीमा नसते. म्हणूनच आता विचारांना विश्रांती देऊन शब्दांना पूर्णविराम देतो. नाहीतरी म्हटलेच आहे........

'जिथे न पोहोचे रवी,
तिथे पोहोचे कवी !'

www.saiphy.com

सुरुवात

## निबंध - आत्मकथा

आकाशाच्या सरोवरात पृथ्वीचे कमळपुष्प उमलले आहे. या कमळपुष्पाच्या पाकळीवर दवबिंदू पडलेला आहे. त्या दवबिंदूचे नाव म्हणजे 'जीवन'. अशा या जीवनात अनेक सुख - दु:खाचे प्रसंग येतात. जीवन क्षणिक आहे. तरी सुंदर, सर्वांचे जीवन वेगवेगळे तरी स्वाद एकच. कधी मधूर, कधी गोड, कधी कडू तर कधी तिखट.

''कथा ही रंगीत दिवसांची,
कथा ही अंधार रात्रीची,
जीवनकथा ही माझी-तुमची,
काही स्वप्नांची, काही आसवांची''

माझे जीवन देखील असे सुख - दु:खांनी भरलेले आहे. मग ऐकाल का माझी कहाणी ?
मी / माझे नाव .................................................................

(यानंतर तीन परिच्छेद लिहावेत.)

## शेवट

असेच माझ्या जीवनात अनेक अश्रूवन आले. मी त्याचे उपवन बनवले. अनेक काटे टोचले. मी त्यातूनच बाग बनवली. मला तुम्हाला एकच संदेश द्यायचा आहे की, आपल्या दु:खापासून पळू नका. कारण दु:खातूनच सुखाचा अर्थ कळतो. अंधारातूनच प्रकाशाचा नवा मार्ग सापडतो.

'एक धागा सुखाचा,
शंभर धागे दु:खाचे,
जरतारी हे वस्त्र मानवा,
तुझिया आयुष्याचे !'